
प्रविणचंद शहा
व
मांगीलाल शामसुखा

117

200Rs.




रु. २०० पैसे

मांगीलाल लखमीचंद शामसुखा

दस्तऐवज 2800
सन १९८१
दिनांकास
दरम्यान नाशिक चे दुय्यम
निबंधक यांचे कार्यालयात आणून
दिला

घेतलेली फी —
नोंदणी .. ८०-००
फोटो पाने ५ १४-००
टपाल .. ५-००
एकूण .. ९९-००

दुय्यम निबंधक, नाशिक

दुय्यम निबंधक, नाशिक

NSK
2800 | 117
1981

॥ श्री ॥

## -: फरोक्त खरेदीखत :-

फरोक्त खरेदीखत आज दिनांक ६ माहे जुलै सन १९८१, ते रोज सोमवार ते दिवशी, नाशिक मुक्कामी :-

... २ वर ...

118

NSK 2800/2/7 1981



श्री· प्रविणचंद वालचंद शहा, उ·व·३८, धंदा शेती व व्यापार, रा· आर·टी·ओ·समोर, जयंती-हौसिंग सोसायटी, शरणपुर रोड, नासिक ४२२ ००२. } लिहून घेणार

-: यांसी :-

श्री·मांगीलाल लखमीचंद शामसुखा, उ·व·६०, धंदा शेती व व्यापार, रा·घ·नं·८७७, गायधनी गल्ली, नासिक ४२२ ००१. } लिहून देणार

खरेदीखत शेत जमिनीचे किंमत रु·७,०००/-

कारणें फरोक्त खारेदीखात लिहून देतों कीं, :-

१· तुकडी जिल्हा नासिक, पोट तुकडी तालुका नासिक पैकी आडगांव शिवारांतील नासिक जिल्हा परिषद हद्दीतील शेत जमिनीची मिळकत सर्व्हे नंबर ८८/अ/१/२, क्षेत्र हेक्टर ०=११ आर, आकार ०=२५पैसे ही शेत जमिन मी [१] श्री· रंगनाथ रामभाऊ लोहकरे, [२]श्री·गबाजी रामभाऊ लोहकरे, [३]श्री·वामन रामभाऊ लोहकरे, [४]श्री·किसन रामभाऊ लोहकरे, [५]श्रीमती सिताबाई रामभाऊ लोहकरे, [६]श्री·सुदान बाळु मते, [७] मधुकर बाळु मते, [८] श्री· हरी त्र्यंबक मते, [९] श्रीमती चंद्रभागाबाई बाळु मते, [१०] श्री· दशरथ काशिनाथ लभडे, [११] श्री· चंद्रभान काशिनाथ लभडे, [१२] श्री· दिनकर काशिनाथ लभडे, सर्व राहाणार-आडगांव, ता· जि· नासिक, हयांचेकडून तारीख १८ जानेवारी १९८० रोजी खरेदी घेतलेली असून, सदर खरेदीखत नासिक येथील मे· सब रजिस्ट्रार

··· ३ वर ···

112

40 Rs.

चालीस रुपया

भारत

INDIA

FORTY RUPEES

४० रु. 40 RS.

मा क. अ. नं १५०२ किंमत रुपये. ४० पैसे

दिनांक ३-५-८९ अक्षरी रुपये चाळीस फक्त

श्री. मांगीलाल लखमीचंद रामसुरना, नासिक ग्रा. रं. सुरना

स्टँप वेंडर,

स्टँप विकत घेणाराचा सही. नासिक कचेरी.

NSK

2800/3/7

1987

- ३ -

साहेब, नासिक, हयांचे कचेरीत दिनांक १८ जानेवारी १९८० रोजी नोंदलेले आहे. तेव्हां पासून सदरची मिळकत माझे कब्जे वहिवाटीत व उपभोगात आहे. तिच खालील कलम दोन मध्यें वर्णन केलेली शेत जमिनीची मिळकत मी तुम्हांस माझे मालकी हककानें, सदरचे खरेदीखतानें खरेदी देत आहे.

२. <u>मिळकतीचे वर्णन</u> :- तुकडी जिल्हा नासिक= पोट तुकडी तालुका नासिक पैकी आडगांव शिवारांतील नासिक जिल्हा परिषद हददीतील, शेत जमिनीची मिळकत, जिचा सर्व्हे नं. ८८/अ/१/२, ज्याचे एकुण क्षेत्र हेक्टर ०=११ आर, आकार रुपये ०=२५ पैसे, आता हया जमिनीत गट पडलेले असुन, ही शेत जमिन जिचा गट नंबर ४० असा झाला आहे. हयाच्या चतु:सिमा :-

| | |
|---|---|
| पुर्वेस | - गट नंबर ३९ [सर्व्हे नंबर ८८/अ/१/३] |
| पश्चिमेस | - गट नंबर ४१ सर्व्हे नंबर ८८ / १/अ + १/ब + १/क |
| दक्षिणेस | - गट नंबर ४१ सर्व्हे नंबर ८८ / १/अ + १/ब + १/क |
| उत्तरेस | - आग्रारोड |

... ४ वर...

120

NSK
2800/4/7
198



येणेप्रमाणें चतु:सिमेतील जमिनीची मिळकत तदंगभुत सर्व वस्तुंसह दरोबस्त. जल, तरु, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेप, व तदंगभुत सर्व वस्तुंसह, मिळकत दरोबस्त.


३. वर कलम दोन मध्यें वर्णन केलेली शेत जमिनीची मिळकत मी तुम्हांस उक्ती किंमत रुपये ७,०००=०० अक्षरी रुपये सात हजार ऐवजी विकण्याचा सौदा केलेला असून, त्याप्रमाणें तारीख १४ एप्रिल १९८१ रोजी साठेखत लिहून देऊन किंमतीचे पोटी विसार म्हणून तुमचेकडून रक्कम रुपये ३,०००=०० अक्षरी रुपये तीन हजार रोख घेतलेले आहेत. ते मला मिळालेले आहेत. बाकीची राहिलेली सर्व रक्कम रुपये ४,०००=०० अक्षरी रुपये चार हजार नासिक येथील मेहेरबान सब रजिस्ट्रार साहेब, नासिक, हयांचे समोर घेऊन, वरील वर्णनाची शेत जमिनीची मिळकत मी तुम्हांस एकूण किंमत रुपये ७,०००=०० अक्षरी रुपये सात हजार ऐवजी फरोक्त खरेदी देऊन, तुमचे कब्जांत व उपभोगांत दिलेली आहे. तिचा उपभोग तुम्हीं वंशपरंपरा घेत जावा अगर तुम्हांस पाहिजे तशी तिची विल्हेवाट लावावी. त्याकामी कोणीही तुम्हांस हिल्ला हरकत करणार नाहीं. कोणीहि हिल्ला हरकत केल्यांस, त्याचे निवारण मी व माझे पश्चात माझे वारस स्वखर्चानें करुन देतील. त्याकामी तुम्हांस तोशिश लागु देणार नाहीं. आता हया मिळकतीवर माझा अगर माझे इस्टेट वारसांचा कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, हितसंबंध राहिलेला नाहीं. सदरची मिळकत मी हयापुर्वी कोठेही गहाण, दान, बक्षीस, करार, वगैरे कोणत्याही जडजोखामांत गुंतविलेली नाहीं. सदरची मिळकत कोणत्याही प्रकारच्या जडजोखामांत गुंतविलेली आहे, असे निष्पन्न झाल्यांस, त्याचे निवारण मी माझे पदर खर्चानें करुन देईल. त्याची तोशिस तुम्हांस लागु देणार नाहीं.

४. सदरची मिळकत ही नागरी जमिन कमाल धारणा कक्षेत येत नसल्यानें, सदरहु व्यवहारांस अर्बन सिलींगची परवानगी घेण्याची आवश्यकता नाहीं.

... ५ वर ...

12

5 RS




| NSK |
| --- |
| 2800/5/7 |
| 14.. |

\- ५ -

५. सदरची मिळकत शेत जमिन म्हणुन तुम्हांस खरेदी के. आहे. आपण दोघेही शेतकरी असल्यामुळें सदरहु व्यवहारांस मुंबई कुळ कायदा कलम ६३ अन्वयेंची परवानगी घेण्याची आवश्यकता नाहीं.

६. सदरचे खरेदीखताचा सर्व खर्च जसे स्टँम्प, टायपिंग, नोंदाई, वकील फी, वगैरे सर्व खर्च लिहून घेणार व लिहून देणार यांनी निम्मानिम्मा केलेला आहे.

७. सदरचे मिळकतीचे संबंधीचे सर्व प्रकारचे कर आज तारखो पावेतोचें लिहून देणार हयांनी भारलेले आहेत. येथुन पुढे येणारे सर्व प्रकारचे कर तुमचे तुम्हीं मालकी हक्कानें भरीत जावेत. मागील कांही बाकी निघाल्यांस, ती भरण्याची जबाबदारी माझ्यावर आहे.

८. <u>किंमतीचा भरणा पावला तो येणे प्रमाणें</u> :-

... ६ वर ...

122

NSK 2800/6/7 1981



तपशील

| रक्कम रुपये पैसे | |
|---|---|
| ३,०००=०० | अक्षरी रुपये तीन हजार तारीख १४ एप्रिल १९८१ रोजी साठेखतापोटी तुम्हीं मला रोख दिलेत ते. ते भरणा पावला. भरण्याविषयी तक्रार नाहीं. |
| ४,०००=०० | अक्षरी रुपये चार हजार तुम्हीं मला आज मे. सब रजिस्ट्रार सो. नाशिक, यांच्यासमोर रोख दिलेत ते. ते भरणा पावला. भरण्या विषयी कांहीही तक्रार नाहीं. |
| ७,०००=०० | एकूण रुपये सात हजार. |

येणेप्रमाणें एकूण रुपये ७,०००=०० सात हजाराचा भरणा रोख पावला. भरण्या विषयी कांहीही तक्रार नाहीं.

हे खरेदीखत मी राजीखुशीनें व स्वसंतोषानें अक्कल हुशारीनें आज रोजी नाशिक मुक्कामी लिहून दिले आहे.

मांगीलाल लखमीचंद शाहसुखा

[श्री. मांगीलाल लखमीचंद शामसुखा]
लिहून देणार

साक्षीदार :-

१] बाबुराव बरडपवार

२] [illegible]

123

| NSK |
| --- |
| 2800/7/7 |
| 1981 |

मांगीलाल करमचंद शामसुखा

शेती व व्यापार धं.

रा. नाशिक

दस्तऐवज करून देणार ..........

..........

तथाकथित खरेदीच्या दस्तऐवज

करून दिल्याचे कबूल करतात.

त्यास लिहून घेणार यांनी दुय्यम निबंधक यांचे समक्ष रुपये (२०००/-)

.......... दोन हजार ..........

दिलेले आहेत.

मांगीलाल करमचंद

मदन गोपाळ कचरदास करंजी

व्यापार नाशिक.

दुय्यम निबंधक नाशिक यांचे समक्ष, असे निवेदन करतात की, हे दस्तऐवज करून देणाऱ्या उपरोक्त ओळखतात ...

मदनगोपाल कचरदास करंजी

ता. ६/७/८१

दुय्यम निबंधक, नाशिक

2600

दुय्यम क्रमांक ७ पुस्तकात

नं. नोंदिला.

दिनांक ६/७/ १९८१

दुय्यम निबंधक

नाशिक